# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## प्रायश्चित्तकाळातील पहिला रविवार

## सांयप्रार्थना

*महत्वाची सूचना ः ख्रिस्तसभेची प्रार्थना किंवा ब्रिविअरी प्रार्थना हा प्रकार खूप प्राचीन आहे. मठवासी धर्मगुरूंकडून आलेली ही प्रार्थना चर्च आपली अधिकृत प्रार्थना म्हणून मानते. सदर प्रार्थनेचं एक महत्वाचं वैशिष्टय म्हणजे ही संपूर्ण प्रार्थना बायबलवर आधारीत आहे. धर्मगुरू धर्मभगिनी तसेच अनेक प्रांपचिक ही प्रार्थना नित्यनेमाने करीत असतात. आपल्या संपूर्ण कुटुंबाला एकत्रित करून आपण ही प्रार्थना करावी. चिंतन व गरजेनुसार विनंत्या ह्या प्रार्थनेमध्ये अंतर्भूत करता येतील. ख्रिस्त सभेची ही महत्वाची प्रार्थना करण्यापूर्वी घरात प्रार्थनामय वातावरण तयार करा. टिव्ही मोबाईल बंद करा, घरातल्या राजपिठासमोर मेणबत्त्या लावा, प्रार्थनेला योग्य असे कपडे करा व आपल्या कुटुंबासाठी हा एक भक्तीमय सोहळा बनवा. ख्रिस्तसभेची ही महत्वाची प्रार्थना आपणांस सतत प्रेरणा देत राहो.*

चरण: हे देवा, आमच्या सहाय्यास ये.

प्रतिसाद: हे प्रभो, माझ्या सहाय्यास धावून ये.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

गीत ः उपवास काळातील गीत

**प्रतिगीत १:** तुम्ही आपला देव परमेश्वर याची स्तुती करा, केवळ त्याचीच सेवा करा.

**स्तोत्र - ११० : १ - ५, ७**

माझ्या प्रभूला परमेश्वर म्हणतो,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत तू माझ्या उजवीकडे बैस.

परमेश्वर तुझे बलवेत्र सियोनेतून पुढे नेईल;
तो म्हणतो, तू आपल्या शत्रूवर प्रभुत्व कर.

तुझ्या पराक्रमाच्या दिवशी तुझे लोक संतोषाने पुढे होतात,
पावित्र्याने मंडित झालेले तुझे तरूण
तुला पहाटेच्या दहिवरासारखे आहेत.

परमेश्वराने शपथ वाहिली आहे
आणि ती तो बदलणार नाही;
ती अशी की, मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे तू युगानुयुग याजक आहेस.

तुझ्या उजव्या हाताकडे असलेला प्रभू
आपल्या क्रोधाच्या दिवशी राजांचा बीमोड करील;

मार्गाने चालत असता तो ओहोळातले पाणी पिईल;
आणि आपले डोके वर करील.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: तुम्ही आपला देव परमेश्वर याची स्तुती करा, केवळ त्याचीच सेवा करा.

*******

प्रतिगीत २: आताच समय अनुकूल आहे. आजच तारणाचा दिवस आहे.

स्तोत्र ११४

इस्त्राएल मिसर देशातून निघाला,
याकोबाचे घराणे परकी भाषा बोलणाऱ्या लोकांतून निघाले;
तेव्हा यहूदा त्याचे पवित्रस्थान झाला,
इस्त्राएल त्याचे राज्य झाला.

हे पाहून समुद्र पळाला;
यार्देन मागे हटली.
पर्वतांनी मेंढयांसारख्या आणि
टेकडयांनी कोकरांसारख्या उडया मारल्या.

हे समुद्रा, तुला काय झाले म्हणून तू पळतोस?
हे यार्देने, तुला काय झाले म्हणून तू मागे हटतेस?
अहो पर्वतांनो, तुम्हाला काय झाले म्हणून
तुम्ही मेंढयांसारख्या उडया मारता?

अहो टेकडयांनो, तुम्हाला काय झाले म्हणून
तुम्ही कोकरांसारख्या उडया मारता ?

**हे** पृथ्वी, तू प्रभूसमोर, याकोबाच्या देवासमोर, थरथर काप.
तो खडक पालटून पाण्याचे तळे करतो,
गारेचा खडक पालटून पाण्याचा झरा करतो.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत २: आताच समय अनुकूल आहे. आजच तारणाचा दिवस आहे.

*******

प्रतिगीत ३: आता आपण येरूशलेमला वर जात आहोत, आणि परमेश्वर पुत्राविषयी जे लिहिले आहे ते सत्यात उतरेल.

काव्य - १ पेत्र २: २१-२४

**ख्रि**स्तानेही तुम्हासाठी दु:ख भोगले
आणि तेणेकरून तुम्ही त्याच्या पावलावर पाऊल ठेवून चालावे
म्हणून त्याने तुम्हाकरिता कित्ता घालून दिला आहे;

**त्या**ने पाप केले नाही
आणि त्याच्या मुखात कपट आढळले नाही;
त्याची निंदा होत असता
त्याने उलट निंदा केली नाही;

**दु**:ख भोगीत असता
त्याने धमकाविले नाही;
तर यथार्थ न्याय करणाऱ्याकडे
स्वत:ला सोपवून दिले.

**त्या**ने स्वत: तुमची आमची पापे स्वदेही वाहून खांबावर नेली,
ह्यासाठी की आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठी जगावे.

**त्या**ला बसलेल्या माराने तुम्ही निरोगी झाला आहा.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत ३: आता आपण येरूशलेमला वर जात आहोत, आणि परमेश्वर पुत्राविषयी जे लिहिले आहे ते सत्यात उतरेल.

**शास्त्रवाचन** १ करिंथ ९: २४ - २५

शर्यतीत धावणारे सर्व धावतात पण एकालाच बक्षीस मिळते हे तुम्हाला ठाऊक नाही काय? असे धावा की तुम्हाला ते मिळेल. स्पर्धेत भाग घेणारा प्रत्येक जण सर्व गोष्टीविषयी इंद्रियदमन करितो; ते नाशवंत मुकूट मिळविण्यासाठी असे करितात, आपण तर अविनाशी मुकूट मिळविण्यासाठी असे करितो.

**लघु प्रतिसाद**

प्रतिसाद: हे परमेश्वरा, दया कर आणि आमची प्रार्थना ऐक, कारण आम्ही तुझ्याविरूद्ध पाप केले आहे.
प्रतिसाद: हे परमेश्वरा, दया कर आणि आमची प्रार्थना ऐक, कारण आम्ही तुझ्याविरूद्ध पाप केले आहे.
चरण: हे ख्रिस्ता, तुझा धावा करणाऱ्यांच्या प्रार्थना ऐकून घे.
प्रतिसाद: हे परमेश्वरा, दया कर आणि आमची प्रार्थना ऐक, कारण आम्ही तुझ्याविरूद्ध पाप केले आहे.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: हे परमेश्वरा, दया कर आणि आमची प्रार्थना ऐक, कारण आम्ही तुझ्याविरूद्ध पाप केले आहे.

मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत: हे सनातन मुक्तिदात्या, आमचा सांभाळ कर. दुष्ट शत्रूपासून आमचे रक्षण कर कारण तूच सर्वकाळ आमचा सहाय्यक झाला आहेस.

**मरियेचे स्तोत्र:** लूक १:४६-५५

'माझा जीव प्रभूला' थोर मानितो
आणि 'देव जो माझा तारणारा' त्याच्यामुळे माझा आत्मा 'उल्हासला आहे;'

कारण 'त्याने' आपल्या 'दासीच्या दैन्यावस्थेचे अवलोकन केले आहे.'
पाहा, आतापासून सर्व पिढया मला धन्य म्हणतील;

कारण जो समर्थ आहे,
त्याने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत;
आणि 'त्याचे नांव पवित्र आहे,'
आणि जे 'त्याचे भय धरितात,
त्यांच्यावर त्याची दया पिढयान्पिढया आहे.'

त्याने आपल्या बाहूने पराक्रम केला आहे;
जे आपल्या अंत:करणाच्या कल्पनेने 'गर्विष्ठ आहेत
त्यांची त्याने दाणादाण केली आहे.'

'त्याने अधिपतींस' राजसनांवरून 'ओढून काढिले आहे,'
'त्याने भुकेलेल्यांस उत्तम पदार्थांनी तृप्त केले आहे,'
व 'धनवानांस रिकामे लावून दिले आहे.'

आपल्या पूर्वजांस' त्याने सांगितले 'त्याप्रमाणे आब्राहाम'
व त्याचे 'संतान ह्यांच्यावरील दया' सर्वकाळ 'स्मरून
त्याने आपला सेवक इस्त्राएल ह्याला साहाय्य केले आहे.'

पिता पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
जसा प्रारंभी होता तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत: हे सनातन मुक्तिदात्या, आमचा सांभाळ कर. दुष्ट शत्रूपासून आमचे रक्षण कर कारण तूच सर्वकाळ आमचा सहाय्यक झाला आहेस.

**मध्यस्थीच्या प्रार्थना**

प्रतिसाद: प्रभो, तुझ्या लोकांवर दया कर.

परमेश्वर पित्याने स्वत:साठी एक प्रजा निवडून घेतली आहे. हे लोक नव्याने जन्मलेले आहेत. त्यांचा जन्म मनुष्य प्रकृतीतून झालेला नसून त्याच्या शाश्वत शब्दापासून झालेला आहे. आपण त्याच्या नामाचा महिमा गाऊ या आणि त्याच्याकडे प्रार्थना करू या. प्रतिसाद: प्रभो, तुझ्या लोकांवर दया कर.

हे दयावंत पित्या, तुझ्या सर्व लोकांसाठी आम्ही करीत असलेल्या आमच्या प्रार्थना ऐकून घे. - भौतिक अन्नापेक्षा त्यांना तुझ्या शब्दाची भूक लागू दे. प्रतिसाद: प्रभो, तुझ्या लोकांवर दया कर.

आमच्या देशातील आणि पृथ्वीवरील सर्व वंशातील लोकांवर प्रामाणिकपणे प्रेम करण्यास आम्हाला शिकव. - आम्ही त्यांच्या कल्याणासाठी व शांतीसाठी झटावे असे कर. प्रतिसाद: प्रभो, तुझ्या लोकांवर दया कर.

बाप्तिस्म्याद्वारे ज्यांचा नवजन्म झालेला आहे त्यांची श्रद्धा दृढ कर. - त्यांना तुझ्या पवित्र आत्म्याच्या मंदिरातील जिवंत धोंडे बनव. प्रतिसाद: प्रभो, तुझ्या लोकांवर दया कर.

मृतांना आपला न्यायाधीश ख्रिस्त ह्याची आशेने भेट घेण्याचे भाग्य लाभो. - त्यांनी तुला समोरासमोर पहावे आणि सर्वकाळ आनंदी रहावे असे कर. प्रतिसाद: प्रभो, तुझ्या लोकांवर दया कर.

आमच्या स्वर्गीय बापा ...

**समारोपाची प्रार्थना:**

हे परमेश्वर बापा, तुझ्या पुत्राचे मरण व पुनरूत्थान याचा अर्थ आम्हाला समजावा व तो आमच्या जीवनात प्रतिबिंबीत व्हावा म्हणून हा प्रायश्चित्तकाळ आम्हाला सहायक ठरो. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.

(धर्मप्रांतीय उपासना आयोग फा. रॉबर्ट डिसोजा हयांच्या अथक परिश्रमाबद्दल तसेच सहाय्य करणा-या सर्वांचा ऋणी आहे.)